**ठळक बातम्या**

- जी-ट्वेंटी देशांच्या शिखर परिषदेत आज प्रधानमंत्री सहभागी होणार
- देश सर्वप्रथम या तत्त्वानुसार राष्ट्रनिर्माण हे सर्व संस्थांचं ध्येय असलं पाहिजे, असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- भारतीय रेल्वेनं २०२५-२६ या आर्थिक वर्षात आतापर्यंत केला एक अब्ज टनांपेक्षा जास्त माल वाहतुकीचा विक्रम
- ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत लक्ष्य सेनची अंतिम फेरीत धडक

  **आणि**
- भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला दुसरा कसोटी क्रिकेट सामना आजपासून गुवाहटी इथं सुरु / नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रिकेचा प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, जी-ट्वेंटी देशांच्या शिखर परिषदेत आज सहभागी होतील. ऐकूया याविषयी अधिक माहिती.

(प्रधानमंत्र्यांचं काल जोहान्सबर्ग इथं जंगी स्वागत झालं, भारतीय समुदाय उत्साहाने त्यांच्या स्वागतासाठी जमला होता.जी ट्वेंटी देशांच्या नेत्यांची शिखर परिषद आजपासून दक्षिण आफ्रिकेत जोहान्सबर्ग इथं सुरु होत आहे. 'ऐक्य, समानता, शाश्वतता' ही यंदाच्या जी-ट्वेंटी परिषदेची संकल्पना आहे. २०२३ मधे अध्यक्षपद भारताकडे असताना दक्षिण आफ्रिकेला या संघटनेचं सदस्यत्व मिळालं.

तीन दिवस चालणाऱ्या या शिखर परिषदेत, प्रधानमंत्री मोदी सर्व सत्रांना उपस्थित राहतील आणि जागतिक दक्षिण चिंता, शाश्वत विकास, हवामान कृती, ऊर्जा संक्रमण आणि जागतिक प्रशासनातील सुधारणांसह भारताच्या प्रमुख प्राधान्यक्रमांचं सादरीकरण करतील.

या परिषदेच्या निमित्ताने जोहान्सबर्गमधे जमलेल्या जागतिक नेत्यांशी ते द्विपक्षीय चर्चा करत आहेत. ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांची भेट घेतली. संरक्षण, महत्त्वाची खनिजे, शिक्षण, व्यापार आणि गुंतवणूक यासह विविध क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य मजबूत करण्यावर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. पंतप्रधान मोदी यांनी दक्षिण आफ्रिकेतील बहुराष्ट्रीय इंटरनेट आणि तंत्रज्ञान कंपनी, नॅस्पर्सच्या वरीष्ठ पदाधिकाऱ्यांशी बैठक घेत स्टार्टअप आणि अवकाश क्षेत्रात गुंतवणूकीसह विविध विषयांवर चर्चा केली.)

वसुधैव कुटुंबकम् - एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य या तत्वावर आधारित भारताची मूल्य आणि सांस्कृतिक वारसा यांचं दर्शन प्रधानमंत्र्याच्या सहभागतून घडणार आहे.

**<><><><><>**

देश सर्वप्रथम या तत्त्वानुसार राष्ट्रनिर्माण हे सर्व संस्थांचं ध्येय असलं पाहिजे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. आंध्र प्रदेशातल्या पुट्टपार्थी इथं श्री सत्य साईबाबा यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यात्मिक संस्थांनी राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात योगदान द्यावं, असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं.

***होल्ड... बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू***

व्यक्तिगत पातळीवर आणि समाज म्हणून वैश्विक शांतीला बळ मिळावं, आणि संपूर्ण मानवतेचं कल्याण व्हावं, यासाठी प्रयत्न करावेत असंही राष्ट्रपती म्हणाल्या. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यसभेचे अध्यक्ष या नात्याने उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी उपाध्यक्ष तालिकेवरच्या नेमणुका केल्या आहेत. डॉक्टर दिनेश शर्मा, भुवनेश्वर

कलिता, एस. फांगनोन कोन्याक, रजनी पाटील, डॉक्टर सस्मित पात्रा, डॉक्टर एम. तंबीदुराई आणि तिरुची सिवा यांचा पीठासीन  अधिकाऱ्यांमधे समावेश करण्यात आला आहे.

<><><><>

केंद्रीय अल्पसंख्याक मंत्रालयाने आज मुंबईत हज परिषदेचं आयोजन केलं आहे. पुढच्या वर्षीच्या हज यात्रेच्या तयारीचा आढावा यात घेण्यात येत  आहे. केंद्रीय अल्पसंख्याक मंत्रालयाचे सचिव चंद्र शेखर कुमार आणि विविध राज्यातल्या हज समित्यांचे अधिकारी परिषदेला उपस्थित आहेत.

<><><><>

गोव्यात पणजी इथं सुरू असलेल्या ५६व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आजच्या तिसऱ्या दिवशी सिनेप्रेमींना विविध जागतिक चित्रपटांची मेजवानी मिळणार आहे. व्हॅलेंटिना बेर्तिनी आणि निकोल बेर्तिनी यांचा ‘मॉस्किटोज’ हा इटालियन चित्रपट, जफार पनाही यांचा ‘इट वॉज जस्ट ॲन ॲक्सिडेंट’, सूर्या बालकृष्णन यांचा ‘दीपा दीदी’ आणि देबांकर बोर्गोहाईन यांचा ‘सिकार’ हा आसामी चित्रपट यासह इतर अनेक चित्रपट आज ‘इफ्फी’मध्ये दाखवले जात आहेत. नारी शक्तीचं स्थान अधोरेखित करण्यासाठी यंदा पहिल्यांदाच ५० महिला दिग्दर्शकांचे चित्रपट इथं दाखवले जात असून आज सिंपल दुगार यांचा ‘लोकमाता देवी अहिल्याबाई’ हा चित्रपट प्रेक्षकांना पाहता येईल. याशिवाय, प्रसिद्ध निर्माते विधू विनोद चोप्रा यांचा मास्टरक्लास, बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या संचालक ट्रिशिया टटल यांच्याशी ‘इफ्फी’चे संचालक शेखर कपूर यांचा संवाद, यासह विविध सत्रं आणि कार्यक्रम इथं होत आहेत.

<><><><>

भारतीय रेल्वेनं २०२५-२६ या आर्थिक वर्षात आतापर्यंत एक अब्ज टन मालवाहतुकीचा आकडा ओलांडला आहे.  या वर्षात १९ नोव्हेंबरपर्यंत १ अब्ज २

कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली आहे, अशी माहिती रेल्वेनं दिली आहे. सर्वाधिक ५० कोटी ५० लाख टन वाहतूक कोळशाची झाली असून खाद्यान्नाची वाहतूक ३ कोटी टन झाली आहे. रेल्वेद्वारे आतापर्यंत ९ कोटी २० लाख टन सिमेंट वाहतूक झाली आहे. सिमेंट क्षेत्राचं वाढतं महत्त्व लक्षात घेऊन रेल्वेनं सुधारणेच्या दिशेनं अनेक पावलं उचलली आहेत. खतांची वाहतूक ४ कोटी २० लाख टन झाली आहे.

एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत रेल्वेनं ९३ कोटी ५० लाख टनांहून जास्त मालवाहतूक केली असून गेल्या वर्षी याच कालावधीत ती सुमारे ९० कोटी ६० लाख टन होती.

रेल्वद्वारे अवजड मालाच्या वाहतुकीत होत असलेल्या वाढीमुळे आर्थिक प्रगतीसह इतरही अनेक लाभ होत आहेत. रस्त्यावर वाहतूक कोंडी कमी करणं, तसंच उद्योगांना पर्यावरणाला अनुकूल दळणवळणाचे पर्याय यामुळे उपलब्ध होत आहेत. निव्वळ कार्बन उत्सर्जनाच्या लक्ष्यानुरूप शाश्वत विकासाला यामुळे चालना मिळत आहे, असं रेल्वेनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रवाशांची मागणी लक्षात घेऊन वांद्रे टर्मिनस आणि पालीताना स्थानकादरम्यान विशेष सुपरफास्ट गाडी चालवण्याचा निर्णय पश्चिम रेल्वेनं घेतला आहे. विशेष भाडे आकारून चालवण्यात येणारी, बांद्रा टर्मिनस-पालीताना सुपरफास्ट स्पेशल, ही गाडी उद्या संध्याकाळी ७ वाजून २५ मिनिटांनी वांद्रे स्थानकातून रवाना होईल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजून २५ मिनिटांनी गुजरातमधल्या पालिताना इथं पोहोचेल. त्याचप्रमाणे पालीताना-बांद्रा टर्मिनस सुपरफास्ट स्पेशल ही गाडी २४ नोव्हेंबरला पालिताना इथून रात्री साडे आठ

वाजता निघेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी पावणे अकराला वांद्रे टर्मिनस इथं पोहोचेल.

बोरीवली, पालघर, वापी, वलसाड, नवसारी, सूरत, वडोदरा, आणंद, अहमदाबाद, बोटाद, धोला, सोनगढ आणि सिहोर इथं या गाडीला थांबा देण्यात आला आहे, अशी माहिती पश्चिम रेल्वेनं दिली आहे.

**<><><><><>**

रशिया आणि युक्रेन यांच्यात शांतता पुनर्स्थापित करण्यासाठी अमेरिकेनं दिलेला प्रस्ताव युक्रेननं फेटाळला, तर रशियाचं सैन्य आगेकूच करत राहील, असा इशारा रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी दिला. रशियाच्या सुरक्षा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. या प्रस्तावाबद्दल अद्याप अमेरिकेशी तपशीलवार चर्चा झालेली नाही, मात्र आपल्याला त्याची प्रत मिळाली आहे, अशी माहिती त्यांनी दिली. युक्रेनचा या प्रस्तावाला विरोध असला, तरीही, रशियाचं सैन्य युक्रेनमध्ये आगेकूच करत आहे, याची कल्पना युक्रेन किंवा युरोपीय देशांना नसून शांतता पुनर्स्थापित होईपर्यंत ही आगेकूच सुरू राहील, असंही पुतीन यांनी सांगितलं. दरम्यान, युक्रेनसमोर स्वतःची प्रतिष्ठा गमावणं किंवा अमेरिकेचा पाठिंबा गमावणं असे दोनच पर्याय असल्याचं मत युक्रेनचे अध्यक्ष व्होलोदिमीर झेलेन्स्की यांनी व्यक्त केलं. त्याआधी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हा शांतता प्रस्ताव स्वीकारण्यासाठी युक्रेनला एका महिन्याची मुदत दिली होती. नाटोबद्दल रशियाच्या मागण्यांना पाठिंबा, तसंच रशियाच्या ताब्यात असलेल्या भूभागांना मान्यता देण्याच्या तरतुदी या प्रस्तावात आहेत.

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला दुसरा कसोटी क्रिकेट सामना आजपासून गुवाहटी इथं सुरु झाला. हा मालिकेतला अखेरचा सामना आहे.

या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. त्यानंतर ८२ धावांची दमदार सलामी दिल्यानंतर मार्करम आणि रिकल्टन, एकामागोमाग एक बाद झाले. त्यानंतर स्टब्स आणि कर्णधार टेम्बा बवुमा यांनी अर्धशतकी भागिदारी करत दक्षिण आफ्रिकेचा डाव सावरला.

भारताच्या वतीनं बुमराह आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी एक बळी मिळवला आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दक्षिण आफ्रिकेनं पहिल्या डावात २ बाद १४७ धावा केल्या होत्या.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या लक्ष्य सेननं पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. सिडनी इथं आज झालेल्या  उपांत्य सामन्यात त्यानं तैवानच्या  चाऊ तिएन-चेन ला १७-२१, २४-२२, २१-१६ असं हरवलं. जागतिक क्रमवारीत चाऊ तिएन चेन दुसऱ्या तर लक्ष्य सेन सातव्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

मध्य प्रदेशात काही ठिकाणी आज थंडीची लाट येण्याची शक्यता आहे. अंदमान आणि निकोबार बेटं, केरळ, माहे, तामिळनाडू, पुदुचेरी आणि कराईकलच्या काही भागात विजांसह मुसळधार पाऊस आणि वादळ होण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. येत्या २५ तारखेपर्यंत अंदमान आणि निकोबार बेटांवर हवामानाची परिस्थिती अशीच राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.